[३] नाटक विषयक व्यापक विचार - गोपाळ वामन बापट

रंगभूमी नियतकालिकात आलेल्या नाट्यविषयक लेखांमध्ये गोपाळ वामन बापट यांचा हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. १३२ पृष्ठांचा हा विस्तृत लेख या नियतकालिकात, पहिल्या तीन वर्षात खालीलप्रमाणे प्रसिद्ध झाला आहे.

वर्ष १, अंक ५ व ६, डिसेंबर १९०७ व जानेवारी १९०८ ृष्ठ १ ते १२
वर्ष १, अंक ११, जून १९०८ ृष्ठ १३ ते २०
वर्ष १, अंक १२, जुलै १९०८ ृष्ठ २१ ते ३२
वर्ष २, अंक ४, नोव्हेंबर १९०८ ृष्ठ ३३ ते ४४
वर्ष २, अंक ५/६/७/८, डिसेंबर व जाने/फेब्रु. १९०९ ृष्ठ ४५ ते ७६
वर्ष २, अंक ८/९/१० मार्च/एप्रिल/मे १९०९ ृष्ठ ७७ ते १००
वर्ष २, अंक ११/१२ जून/जुलै १९०९ ृष्ठ १०१ ते १२०
वर्ष ३, अंक ४/५ नोव्हें/डिसें १९०९ ृष्ठ १२१ ते १३२

या निबंधाला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे ती वर्ष ३, अंक ८/९, मार्च/एप्रिल १९१० च्या अंकात छापलेली आहे. (पृष्ठ १ ते ४)

या प्रस्तावनेत व्यक्त केलेले विचार असे आहेत -

श्री. कृ. कोल्हटकर यांनी या प्रस्तावनेत श्री. बापट यांच्या निबंधाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत त्याचप्रमाणे कलेच्या संदर्भात स्वत:चे विचारही व्यक्त केले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, मानवी कृतीच्या संस्कारापासून अलिप्त असे जे स्वत:सिद्ध प्रकार जगात दिसतात त्यांना निसर्ग किंवा नैसर्गिक असे म्हणतात या प्रकारावर मनुष्याने आपले चातुर्य खर्च करून, स्वत:च्या सुखासाठी स्वतंत्र कृती तयार केली म्हणजे तिला कलासृष्टीत स्थान मिळते. साध्याच्या मानाने साधन-संपत्ती अल्प असेल व साध्य स्वतंत्र दृष्टीने जितक्या पूर्ण स्वरूपात दिसून येईल तितक्या मानाने त्या कृतीची कलेच्या दृष्टीने योग्यता ठरत असते.

‘श्री. कृ. कोल्हटकर यांनी, कलेच्या बाबतीत अल्प साधनसंपत्ती हे श्रेष्ठत्वाचे गमक सांगितले आहे. परंतु नाटकाला तर अनेक साधने लागतात आणि तरीही तो एक श्रेष्ठ कलाप्रकार मानला जातो. याचा अर्थ नाट्यकलेची महत्ता साधनां खेरीज अन्यत्र कोणत्या तरी ठिकाणी असली पाहिजे आणि श्री. बापट यांच्या निबंधात तो विचार आलेला आहे हे त्या निबंधाचे वैशिष्ट्य आहे.

श्री. कृ. कोल्हटकर यांनी त्याचा उल्लेख केलेलाच आहे. श्री. बापट यांनी नाटकाची व्याख्या केलेली आहे. त्याचे मुख्य घटकावयव सांगितले आहेत. संविधानक, शील व रस यांचे विवेचन त्यांनी केलेले आहे.

ज्याचा अनुभव नेत्र व कर्णद्वारा एकसमयावच्छेदेकरून अनेकांस घेता येतो, त्यांस ललितकला म्हणतात असे सांगून श्री. कृ. कोल्हटकर यांनी चित्र, शिल्प, गान, काव्य, नाटक यांचा ललितकलेत अंतर्भाव केला आहे. नाटक हे दृक्‌श्राव्य असून नाट्यप्रयोगाचे पोषण गायन, नृत्य, चित्र इ. अवांतर ललितकलांकडून केले जाते. नाटकात कृती बद्दलचा विचार महत्त्वाचा असतो. या विचारात कृती करणाऱ्या व्यक्तीचे शील, त्यावरील परिस्थितीचा संस्कार व त्यामुळे त्या व्यक्तीच्या मनात उद्‌भवलेली वासना इ. चा विचार येतो. नाटकशास्त्राच्या अभ्यासात, नाटकातील कल्पना, रस, संविधानक, पात्रांचे स्वभाव व वासना मनोरंजक असण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक असतात त्याचा अभ्यास येतो.

श्री. कृ. कोल्हटकर यांनी श्री. बापट यांच्या निबंधाबद्दल असा अभिप्राय व्यक्त केला आहे की त्यांनी नाटकशास्त्रातील मूलतत्त्वांचा व मुख्य सिद्धांतांचा खोल व व्यापक विचार केला आहे. असा विचार पाश्चात्यांकडे मोल्टन वगैरे काही ग्रंथकारांनी केला आहे परंतु मराठीत अशा प्रकारचा व अशा योग्यतेचा हा पहिलाच निबंध आहे. श्री. बापट यांची निर्विकार व नि:पक्षपाती बुद्धी व सौजन्य यांचाही उल्लेख श्री. कृ. कोल्हटकर यांनी केला आहे. श्री. बापट यांच्या मतांहून इतरांची मते कितीही भिन्न असली तरी त्यासंबंधाने कठोर भाषा कोठेही वापरलेली नाही हेही आपल्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. तत्कालीन समीक्षकांची वैचारिक पातळी किती उच्च दर्जाची होती, सुसंस्कृतपणा व संयम यांना ते किती महत्त्व देत होते, हे यावरून कळून येते. उत्तम टीकाकाराबद्दलची कल्पना येथे स्पष्ट होते.

श्री. गोपाळ वामन बापट यांच्या ‘ नाटकविषयक व्यापक विचार या निबंधाच्या शेवटी एकूण विवेचनाचे सार दिलेले आहे. ते येथे नमूद करून मग महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्ष घेणे उचित होईल. या संक्षिप्त गोषवाऱ्यातून निबंधांतील विषयांची कल्पना येईल.

नाटकविषयकव्यापक विचार – गो. वा. बापट
एकूण विवेचनाचे सार

(१) नाटक हे काव्य असून ते लोकांचे मनोरंजन करून उपदेश करते. राम, युधिष्ठिर, हरिश्चंद्र इ. महानुभावांची चरित्रे नाटकरूपाने पहावयास मिळतात. मनुष्यस्वभावाची ओळख नाटकरूपाने करून देता येते. नाटककार व चित्रकार यांचे एक प्रकारे साम्य आहे. परंतु नाटककारास पुढे मजल चालावयाची असते. चित्रकारास एकाच प्रकारचा मनोविकार दाखवावयाचा असतो. परंतु नाटककारांस अनेक प्रसंगांचे मनोविकार दाखवावयाचे असतात. (पृ.१ ते १०)

(२) मनुष्य स्वभावाचे वर्णन : एकाच मनुष्यात भिन्न प्रकारचे स्वभाव असू शकतील काय दुष्यंत प्रसंगी खोटे बोलतो. रोमिओ ज्युलिएटला पाहिल्याबरोबर रोझालिन्‌ला विसरतो. राम, सीतेचा त्याग अरण्यात करतो, ज्युलिएटला आपल्या भावाला रोमियोने मारल्याबद्दल काही वाटत नाही. इ. एकाच मनुष्यात भिन्न स्वभावधर्म. (पृष्ठ ११ ते १८)

(३) नाटककारास हजारो वर्षापूर्वीच्या होऊन गेलेल्या व्यक्तीच्या स्वभावाची ओळख पाहिजे. भवभूतीने व कालिदासाने राम व दुष्यंताच्या स्वभावाचे वर्णन त्यांचा काळ लोटून गेल्यावर किती तरी काळांनी मागून लिहिले आहे हे सामर्थ्य अलीकडील नाटककाराच्या ठिकाणी नाही. (पृष्ठ १९ ते २०)

(४) हीन दर्जाचे नाटककार लोकांच्या रुचिवैचित्र्याच्या सबबीवर आपला कमीपणा झाकून नेण्याचा प्रयत्न करतात. गोष्टी सांगणारे कादंबरीकार व नाटककार यांच्या कृतीतील फरक. नाटक कशाने बनते (पृष्ठ २१ ते २७) नाटकाचे घटकावयव (Situations and Incidents) शाकुंतल नाटकाचे उदाहरण. (पृष्ठ २८ ते ३०)

(५) मुसलमानी अमदानीत नाटकाच्या कलेचा अस्त होऊन इंग्रजी अमदानीत तिची सुरुवात झाली. प्रथम भाषांतरापासून सुरुवात. (पृष्ठ ३१ ते ३५)

(६) प्रेक्षकांच्या विचाराशी व रीतीभातीशी नाटकातले रीतिरिवाज व आचारविचार यांचा विसंवाद असला तर नाटकाच्या मनोरंजकत्वाची हानी होते कां (पृष्ठ ३६ ते ४४)

(७) Romantic drama अद्‌भुत रसाची नाटके व त्यांचा मनोरंजकत्वाशी संबंध. (पृष्ठ ४६ ते ५०) संविधानक. Unity of place, Time and action (पृष्ठ ५१ ते ६०) संविधानकाविषयी विस्तृत विचार (Development) (पृष्ठ ६१ ते ७७)

(८) मनुष्य स्वभावाविषयी सामान्य व तात्त्विक विचार - दुष्यंत व चारूदत्त यांच्या शीलाचे सोपपत्तिक उदाहरणांनी विवेचन व त्यासंबंधाने नाटककाराची कामगिरी. ती समजण्याची टीकाकारांची व प्रेक्षकांची अपात्रता (पृष्ठ ७८ ते ९९)

(९) रसांचे स्थायीभाव, विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव इ. ची माहिती (पृष्ठ १०० ते १०२) निरनिराळ्या रसांचे विवरण. पात्रांकडून, नाटककारांकडून देखाव्याच्या रूपाने रसभंग होण्याची कारणे (पृष्ठ १०३ ते १२४)

(१०) आत्मगत व लांबलचक भाषणे व त्यांस लेक्चरचे स्वरूप सृष्टिसौंदर्याच्या किंवा निर्जीव व सजीव वस्तूच्या वर्णनाने रसभंगाचे प्रसंग-वर्णनाशी व प्रत्यक्ष गोष्टींशी विरोध व त्यापासून रसभंग. (पृष्ठ १२५ ते १२९) नाटकाचे महत्त्व व विषयसमाप्ती. (पृष्ठ १३० ते १३२)

श्री. बापट यांच्या नाटकविषयकव्यापक विचार या निबंधाचा विस्तृत परामर्ष

आपल्या निबंधाच्या सुरुवातीलाच श्री. बापट यांनी, नाटकरचना व नाटकाचे रंगभूमीवर प्रयोग ही, नाटक या विषयाची दोन अंगे असल्याचे स्पष्ट केले आहे. व या दृष्टीने, नाटकाच्या या दोन वेगवेगळ्या अंगांचा, वेगवेगळा विचार केला पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

याचा अर्थ संहितासमीक्षा व प्रयोगसमीक्षा ही समीक्षेची दोन रूपे किंवा दोन पद्धती श्री. बापट मानीत होते हे स्पष्ट आहे.

दृश्य या विशेषणाने, नाटक हे काव्यापासून भिन्न केले जाते असा दोन्हीतला फरक त्यांनी स्पष्ट केला आहे. नाटकाने मनोरंजन होऊन अनायासे उपदेश होतो. नाटककाराच्या कृतीत एक प्रकारची जादू असते त्यामुळे नाटके अनेक भाव मनात निर्माण करतात. नाटकाचे मर्म कळण्यासाठी नाटकाचे रूप व नाटकासंबंधी इतर विषयांची माहिती असणे जरूर आहे. नाटक रचताना व रंगभूमीवर त्याचे प्रयोग करताना उपयोगी पडण्यासारखा एखादा ग्रंथ

असणे जरूर आहे असा विचार श्री. बापट यांनी व्यक्त केला आहे. नाटके, काहीतरी नियमास अनुसरूनच असली पाहिजेत. मनुष्य स्वभावातील वैचित्र्य पाहाण्याची जिज्ञासा तृप्त करून घेण्याचे ठिकाण म्हणजे रंगभूमी. नाटकगृहात तटस्थ बसून राग-लोभ इ. मनोविकारांची एकमेकांशी होणारी झटपट व लटपट तसेच विचारांशी मनोविकारांचे होत असलेले तुमुल युद्ध मनुष्यास रंगभूमीवर पाहाता येते.

या ठिकाणी ते प्रेक्षकांच्या ‘ ताटस्थ्या बद्दलचा आलेला विचार पूर्णपणे मान्य होणारा नाही. यासंबंधी पुढील काळात अधिक विचारही मांडला गेला आहे. प्रेक्षक हा वाटतो तसा नाटक पाहाताना खरोखरी तटस्थ असतो का वास्तविक अंतर्यामी तो तटस्थ नसतो. त्याच्या मानसिक रंगभूमीवर समोरच्या दृश्यांचे, संवादांचे, प्रतिबिंब, पडसाद उमटत असतात आणि असे घडणे हे नाटकाचे यश आहे. प्रेक्षक निर्विकार राहिला तर नाटकप्रयोग कोलमडेल. श्री. बापट म्हणतात की, नाटककार हा मेसमराइझरच्या तोडीचा असला पाहिजे. समोर दिसणारी दृश्ये हा सर्व आभास आहे हे माहीत असूनही ते सर्व खरोखरीच घडत आहे असे वाटले पाहिजे. थोडक्यात, नाटककाराच्या वचनात जादू पाहिजे. त्याच्या पात्रे आखण्यात जादू पाहिजे. व खेळ आखण्यात जादू पाहिजे.

नाटककाराचे शब्द, व्यक्तिरेखाटन व नाट्यप्रयोग या तिन्हींच्या संदर्भातील हे विवेचन आहे. या तिन्हीतील अलौकिकत्व ‘ जादू या शब्दातून व्यक्त केलेले दिसते.

श्री. बापट यांनी चित्रकार व नाटककार यांच्यातील साम्यभेद स्पष्ट केला आहे. नाटककाराच्या कामगिरीचा विषय मनुष्य व त्याचे मनोविकार हा असून त्याच्या कृतीची कसोटी सहृदय मनुष्याचे अंत:करण आहे. चित्रकारापेक्षा नाटककाराची जबाबदारी मोठी आहे असे ते सांगतात.

नाटकाचे उत्पत्तिस्थान मनुष्यस्वभाव हे आहे. कोणत्याही कलेची मूर्त (concrete) व अमूर्त (abstract) अशी दोन अंगे असतात. या दोन अंगांचा जोड म्हणजे कला. अमूर्ताला मूर्त रूप देणे म्हणजे काय ते, नाटकातील पात्रांच्या उदाहरणाने त्यांनी स्पष्ट केले आहे. वेगवेगळ्या गुणावगुणांचे साहचर्य दाखविताना नाटककाराला कोणत्या विशिष्ट गुणाशी कोणत्या विशिष्ट अवगुणांचे साहचर्य असू शकते व असू शकत नाही, हे समजावे लागते. हा मुद्दा संस्कृत व इंग्रजी नाटकांमधील व्यक्तिरेखांच्या उदाहरणांनी त्यांनी स्पष्ट केला आहे.

मनुष्यस्वभाव समजण्यास उपजत दृष्टी असावी लागते. हे विवेचन शास्त्रदृष्टीने व शास्त्रपद्धतीने केलेले नाही असे त्यांनी म्हटलेले आहे.

श्री. बापट यांना अभिप्रेत असलेले शास्त्र म्हणजे मानसशास्त्र असले पाहिजे. त्याकाळी नुकताच या शास्त्राचा परिचय, पाश्चात्य ज्ञान मिळविलेल्या नवविद्वानांना होऊ लागलेला होता. तो पूर्णपणे झालेला नव्हता पण या ज्ञानशाखेचे भान आलेले होते. म्हणून श्री. बापट यांच्यासारख्या चौफेर दृष्टीच्या, व्यासंगी विद्वानाला आपल्या लेखनातील या मर्यादेची जाणीव झाली आणि ती प्रगट करण्याचा मोठेपणाही त्यांनी दाखविला.

नाटककार होण्यासाठी अगाध ज्ञान, कल्पनाशक्ती व तीव्र अवलोकशक्ती असली पाहिजे. प्रगल्भ बुध्दी, शांत, गंभीर स्वभाव असला पाहिजे, असे ते सांगतात. साध्या रितीने गोष्टी सांगणारे, कादंबरीकार व नाटककार या तिघांच्या कृतीचा पाया एकच आहे. त्यांची गोष्ट सांगण्याची रीत वेगळी, हाच काय तो त्यांच्या कृतीत फरक आहे. हे तिघेही काय करतात हे त्यांनी पुढे सांगितले आहे, ते असे -

(१) पुराणांतून, इतिहासांतून किंवा दंतकथांतून ते एखाद्या मनुष्याचा आयुर्वृत्तान्त (Life lived) घेतात.
(२) जर या तिन्हीतून आयुर्वत्तान्त घेतला नाही तर एखाद्या सद्गुणाची अथवा दुर्गुणाची मन:कल्पना घेऊन तो गुण अथवा दुर्गुण ज्याचे ठिकाणी आहे असा आयुर्वृत्तान्त ते कल्पनेने उभा करतात.
(३) मनुष्याचा एकाकी आयुर्वृत्तान्त बहुतेक घडत नाही. त्याचा इतर मनुष्याशी संबंध येतो. व त्याच्या व इतरांच्या परस्पर संबंधांच्या कृती मिळून एक आयुर्वृत्तान्त बनतो म्हणून पहिल्या कृतीत एकाकी वृत्तांत न घेता दोन्ही मिळून झालेला आयुर्वृत्तान्त तो घेतो व दुसऱ्या कृतीत तसला आयुर्वृत्तान्त तो रचतो.

मनुष्याचे आयु स्थिर नाही त्याला गती आहे, यामुळे आयु:क्रमातील स्थितीस उगम, मध्य व अंत आहे. या स्थितिपरंपरा मिळून नाटक बनते.

हे सगळे विवेचन, कथेचे नाटक कसे बनते, नाट्य कसे आकाराला येते. मूळ बिंदूपासून इष्टसाध्यापर्यंत ते कसे जाऊन पोहोचते या विषयीचे आहे. याच संदर्भात मोठे घटकावयव (Situations) व लहान लहान स्थिती (Incident) यांचा सोदाहरण विचार मांडलेला आहे. शाकुंतल नाटकाच्या उदाहरणावरून स्पष्ट केलेला हा विचार प्रबंधात सविस्तर दिलेला असल्याने येथे घेतलेला नाही.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील तत्त्वेच, आपल्या स्वतंत्र वेगळ्या भाषेत, मूलभूत विचार सोदाहरण मांडून, श्री. बापट यांनी येथे सांगितलेली आहेत असे दिसते.

भरतमुनींनी नाट्यशास्त्रात पंचकार्यावस्था आणि पंचसंधी याबाबतचे विवेचन केलेले आहे. ती माहिती प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकाणात दिलेलीच आहे. श्री. बापट ज्याला मोठे घटकावयव व लहान लहान स्थिती म्हणतात त्याचा मूळ धागा भरतमुनींच्या विवेचनात आहे. संस्कृत साहित्यशास्त्रात भरतमुनींनी सांगितलेली तत्त्वे, मराठी परिभाषा निर्माण करून श्री. बापट यांनी संस्कृत नाटकाला लावून दाखविली हे त्यांचे वेगळेपण व वैशिष्ट्य आहे. अशा पद्धतीचा सूक्ष्म, सांगोपांग विचार मराठीत यापूर्वी आलेला नव्हता. साहित्यशास्त्रीय सिद्धांत, सूत्रमय भाषेतून बाहेर काढून, त्याचे सुलभीकरण करून, सोदाहरण स्पष्ट केले की त्याचे मोल अधिक लक्षात येते. त्या सिद्धांतांची बांधणी किती पक्की आहे ते कळते. सोदाहरण लिहिणाऱ्या अभ्यासकाच्या मनातील त्याबाबतीतील सुस्पष्टता किंवा अस्पष्टताही लक्षात येते. संस्कृतातील साहित्यविचार मराठीत उत्तमप्रकारे रुजविण्याचे कार्य श्री. बापट यांच्या या निबंधातील विवेचनाने केलेले आहे. हे त्याचे महत्त्व आहे.

संस्कृत नाटके व भरतमुनींचे नाट्यशास्त्र हे त्या काळातील सर्वच विद्वानांप्रमाणे श्री. बापट यांच्याही डोळ्यापुढे होते. ‘ आमचे खरे गुरुकुल म्हटले म्हणजे आमचे संस्कृत नाटककार होत (पृ. ३५) असे श्री. बापट यांनी सांगितले आहेच.

पाश्चात्यांच्या नाटकांची भाषांतरे केली म्हणजे आमच्या नाट्यवाङ्मयात मोठी उत्तम भर घातल्यासारखे होते असाही माझा समज नाही असे ते म्हणतात. श्री. बापट यांचे मत स्वतंत्र नाटक निर्मिती व्हावी असे आहे हे स्पष्ट दिसते. भाषांतरित, रुपांतरित नाटके व सुधारकी मते व्यक्त करणारी नाटके या संदर्भात श्री. बापट यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत.

१) प्रेक्षकांच्या आचारविचाराशी व रीतीभातीशी नाटकातले रीतिरिवाज व आचारविचार यांचा विसंवाद असला तर नाटकाचे मनोरंजकत्वाची प्रेक्षकांच्या नजरेने हानी होते की काय

२) तसे असेल तर सध्यांची पाश्चात्य नाटककारांची जी भाषांतरे किंवा रुपांतरे व तशीच सुधारकी नाटके यांच्यातील मनोरंजकत्व जाणण्यास आम्ही नालायक आहोत की काय

मनुष्याच्या आचारविचारांचे दोन भाग करता येतात. एक उदात्त स्वरूपाचे (ennobling) व दुसरा नीच (debasing) स्वरूपाचे. पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही मनुष्याच्या कृतीत पहिले कोणते व दुसरे कोणते याविषयी वाद नसावा असे वाटते असे श्री. बापट म्हणतात. म्हणजे मुख्य तत्त्वाविषयी जर वाद नसेल तर केवळ वेगळ्या चालिरीती किंवा वेगळी मते यासाठी पाश्चात्यांच्या रुपांतरित केलेल्या नाटकांत किंवा सुधारकी मतांचा पुरस्कार केलेल्या नाटकात, रसास्वादात अडथळा येऊ नये असे मत ते व्यक्त करतात. पाश्चात्य रीतिरिवाज व पाश्चात्य विचार यांचा नाटकांच्या संदर्भात विस्तृत विचार श्री. बापट यांनी मांडला आहे.

अद्‌भुतरसासंबंधीही सविस्तर विवेचन करून श्री. बापट यांनी अद्‌भुतरसाच्या नाटकातील वापरामागील तत्त्व मार्मिकपणे सांगितले आहे. नाटकातील ज्या पात्रांवर अद्‌भुताचा परिणाम होतो ती पात्रे त्या परिणामाखाली कशी वागतात, त्यांच्या हातून उच्च किंवा नीच कृती कशा घडतात त्या कृतीचे परिणाम त्यांना व इतरांना कसे भोगावे लागतात हे पाहण्यात नाटकाचे मनोरंजकत्व असते. हा विचार महत्त्वाचा आहे. अद्‌भुतरसावर आक्षेप असणाऱ्या किंवा नाटकातील त्याच्या वापराबद्दल नापसंती दर्शविणाऱ्या प्रेक्षकांच्या समोर त्या संबंधीचे हे मूलभूत स्वरूपाचे विचार मांडलेले आहेत.

भरताच्या नाट्यशास्त्रातील परिभाषा जशी, श्री. बापट यांनी मराठीत सोपी करून सांगितली आहे, तशीच इंग्रजीतील संविधानक रचनेचे Action, Interest, Situation, Unities इत्यादी संज्ञांचे भेदही त्यांनी स्पष्ट केले आहेत. संविधानकरचना, कृती, स्थल व काल यासंबंधी नाटकात पडणाऱ्या खिंडी यांचे सविस्तर विवेचन या निबंधात आहे.

शोकरसात्मक नाटके, नाटकातील मुख्य खेळ्या, नाटकातील मध्यबिंदू, पात्रांचे शील, नाटकातील रस असे अनेक विषय या निबंधात चर्चिले गेले आहेत. रससंख्या, रसाभास,

रसभंग हे विषय, साहित्यसमीक्षेत पुन: पुन: चर्चिले जात असत, त्यामुळे त्याबद्दलचा विचार या निबंधात अपरिहार्यच होता.

श्री. बापट यांच्या निबंधात खूपच मूलभूत स्वरूपाचे, मौलिक विचार असल्याने, हा निबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यावर त्याची रंगभूमी नियतकालिकात आलेली जाहिरात यथार्थ वाटते, ती जाहिरात अशी आहे.

नाटकविषयाची केवळ गीता असा निबंधरुपाने प्रसिद्ध झालेला हा ग्रंथ आहे. व्यापक दृष्टीने या विषयाचा विचार केलेला मराठी भाषेत हा पहिलाच ग्रंथ आहे म्हटले तरी चालेल.
— (जाहिरात, रंगभूमी वर्ष ३, अंक १२, जुलै १९१०)